श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-७, अंक-२ | फेब्रुवारी-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |
|---|---|---|---|

## ‘७० व्या प्रजासत्ताक दिनाचा दिमाखदार सोहळा’

‘श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट’ संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ७० व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचा सोहळा ट्रस्टच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडासंकुलात दिमाखदार पद्धतीने साजरा करण्यात आला. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. आनंद लाडसरिया, मॅनेजिंग डायरेक्टर, एव्हरेस्ट फ्लेव्हर्स लि. व सन्माननीय अतिथी म्हणून श्रीम. आचलाताई जोशी, अध्यक्षा, श्रद्धानंद आश्रम, माटुंगा व मराठी व्यापारी मित्र मंडळ ह्या उपस्थित होत्या.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. भारतीय नागरिकांना हक्क व कर्तव्यांची जाणीव करून देणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याच्या निमित्ताने वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रगीत, ध्वजगीत यांबरोबरच भारावून टाकणारे देशभक्तिपर गीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सादर करून ‘‘भारत माता की जय’’ या नाऱ्याने आसमंत दुमदुमून टाकला. शारीरिक कवायतींचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी अत्यंत लयबद्ध पद्धतीने केले.

भाषा हे ज्ञानार्जनाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. शाळेत विद्यार्थ्यांना भारतीय भाषांबरोबरच जर्मन व स्पॅनिश या भाषादेखील शिकविल्या जातात. भारतीय संस्कृती, परंपरा, विविधतेतील एकता, राष्ट्रध्वजाचे महत्त्व, ऐतिहासिक वारसा, भारतीयांचे विविध क्षेत्रातील योगदान व प्रगती, भारतीयांची देशाप्रती कर्तव्ये, स्वच्छ भारत अभियानाचे महत्त्व, अशा महत्त्वपूर्ण विषयांवर शिशुगटापासून उच्च माध्यमिक



*विजयी विश्‍व तिरंगा प्यारा । झंडा उंचा रहे हमारा ।।*

गटापर्यंतच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, संस्कृत, जर्मन व स्पॅनिश भाषांमधून अभ्यासपूर्ण, मुद्देसूद भाषणे ओजस्वीरीत्या सादर करून सर्वांनाच आपल्या वक्तृत्वाने दिङ्:मुढ केले.

प्रजासत्ताक दिन समारोहाचे औचित्य साधून 'श्री विठ्ठलराव जोशी स्पोर्ट्स अकादमी'मधून नियमित सराव करून आर्चरी, स्विमिंग, योग, मल्लखांब व फुटबॉल ह्या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय व राज्य स्तरावर तसेच 'खेलो इंडिया' स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना भरघोस पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले.

देशभक्तिपर गीते, भारतीय जवानांचे जीवन, त्यांचा त्याग अशा



श्रीमती अचलाताई जोशी आपले विचार व्यक्त करताना

विविध आशयांना मध्यवर्ती ठेवून आधुनिक, पारंपरिक, लोकनृत्य असे विविधतेने नटलेले नृत्यप्रकार विद्यार्थ्यांनी लीलया सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. रणवाद्यांच्या तालावर अत्यंत शिस्तबद्ध, लयबद्ध, जोशपूर्ण रीतीने विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'लेझीम' या क्रीडाप्रकाराचा आस्वाद घेत असतांना सर्वांचेच मन उत्साहित, आनंदित झाले होते. शारीरिक लवचिकता दर्शविणारे योगनृत्य व मल्लखांबावरील चित्तथरारक कसरती सुलभरीत्या सादर करून विद्यार्थ्यांनी शारीरिक व मानसिक संतुलनाचा सुंदर मिलाफ प्रदर्शित केला. शाळेच्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय नेमबाजांनी धनुष्याचा अचूक नेम साधून आपल्या कौशल्याच्या नेत्रदीपक प्रात्यक्षिकाने सर्वच उपस्थितांची वाहवा मिळवली.

सन्माननीय अतिथी श्रीम. आचलाताई जोशी यांनी विद्यार्थ्यांना संबोधताना, शिवरायांच्या या भूमीत प्रजासत्ताक दिन साजरा करण्याचे महत भाग्य लाभल्याबद्दल आनंद व्यक्त केला. त्या पुढे म्हणाल्या की, माझे अहो भाग्य आहे की परमपूज्य काकामहाराजांच्या रूपाने मला आधुनिक काळातील ब्रह्मदेव भेटले. ब्रह्मदेवाने जशी ही सृष्टी निर्माण केली तसेच कार्य श्रीकाका महाराजांनी येथे निर्माण केले आहे. त्यांच्याबरोबर चर्चा करण्यात घालविलेला अल्पकाळ माझ्या



श्री. आनंद लाडसरिया बीजभाषण देताना

उर्वरीत आयुष्यावर चिरकाल परिणाम करणारा आहे. अशा थोर व्यक्तींचा सहवास लाभणे अतिशय दुर्मिळ आहे, त्याचा तुम्ही स्वत:चे आयुष्य उजळून टाकण्यासाठी लाभ करून घ्यावा. पूर्णपणे मानवतेच्या सेवेप्रती उभारलेल्या नि:स्वार्थी कार्याबद्दल आनंद आणि कृतज्ञता व्यक्त करायला माझ्याकडे शब्द अपुरे आहेत.' या शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

आपल्या बीजभाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे श्री. आनंद लाडसरिया म्हणाले की, मी स्वत:ला खूप भाग्यवान समजतो की माझे मित्र श्री. विकासजी वालावलकर यांचे निमंत्रण स्वीकारून मी इथे आलो आणि परमपूज्य श्रीकाकामहाराज यांच्या मार्गदर्शनाखाली वालावलकर कुटुंबीयांनी कोकणातील एका छोट्याशा खेडे गावात निर्माण केलेली ही स्वप्नवत सृष्टी जाणून घेण्याचे भाग्य मला लाभले. शाळा, रुग्णालय, क्रीडासंकुल अशा दर्जेदार सुविधा मुंबईसारख्या विकसित शहरातदेखील मिळणे अवघड आहे. मला तर असे वाटते की मुंबई-पुण्यातील मुलांनी शिक्षणासाठी येथे यावे कारण येथील शैक्षणिक उपक्रम, क्रीडा सुविधा, विविध



राष्ट्रीय धनुर्धर खेळाडू रिया पाकळे हिचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान



नर्सरीतील रुद्र मोहिते धिटाईने आपले विचार मांडताना

भाषांचे शिक्षण हे अकल्पनीय आहेच; परंतु आणखी एक महत्त्वाचे म्हणजे येथे कार्यरत असणाऱ्या प्रत्येकाची निष्ठा व समर्पण. सर्व गोष्टी कशा विनाविघ्न सहजतेने पार पडत आहेत.

कालच श्रीकाकामहाराज यांचे दर्शन घेण्याचा व त्यांच्याशी चर्चा करण्याचा योग आला. तेव्हा ते म्हणाले की, हे सर्व कर्माचे फळ आहे आणि ते असेही म्हणाले, 'ही फक्त सुरुवात आहे, अजून मोठे कार्य घडणे बाकी आहे'. जर ही सुरुवात असेल तर मध्य काय असेल याची कल्पनाच केलेली बरी. २५-३० वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या छोट्याशा कार्याचे एवढे मोठे रूप झाले आहे, त्यासाठी आपणा सर्वांचे अभिनंदन आणि ही संस्था अधिकाधिक फुलावी - फळावी यासाठी माझ्या शुभेच्छा!

विद्यार्थीवर्गाला त्यांनी दोन-तीन शैक्षणिक उपक्रम सुचविले. पहिला म्हणजे चार-पाच विद्यार्थ्यांचा गट करून दर महिन्याला एखाद्या महान व्यक्तीचे चरित्र वाचायचे, त्यांची गुणवैशिष्ट्ये अभ्यासायची, गटात चर्चा करायची, आठवड्यातून एक तास यासाठी द्यावा. यातून मुलांना प्रेरणा मिळेल व त्याचा लाभ होईल.



ज्यु. के. जी. तील हेमांगी खामकरचे आत्मविश्वासपूर्ण वक्तृत्व

दुसरा प्रकल्प म्हणजे विद्यार्थ्यांचा एक गट बनवून त्यांना सामाजिक कार्यासाठी प्रोत्साहन देणे. जसे मोठ्या मुलांनी छोट्यांना शिकवणे, गावातील मुलांना शिकवणे, असे अगदी १२-१४ वर्षे वयापासून कोणत्या तरी सामाजिक व्यवस्थेशी जोडण्याची त्यांना संधी मिळाली तर त्यांमध्ये सकारात्मकतेचा विकास होऊन सामाजिक दुष्ट प्रवृत्तींचा मुकाबला ते करू शकतील; आणि तिसरा उपक्रम म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची आवड निर्माण करणे. आज आपल्याला माहीत आहेच की नोकऱ्या उपलब्ध नाहीत, तेव्हा आजच्या युवकाने नोकरी करणारा नव्हे तर नोकऱ्या देणारा होणे गरजेचे आहे.

ते पुढे म्हणाले की अगदी दोन-तीन लोकांनी सुरू केलेल्या



योगनृत्य

व्यवसायाचे रोपटे काही वर्षांनी इतके मोठे होते त्याचे उदाहरण म्हणजे 'स्वयं' ही संस्था आहे. मी स्वत: नव्याने सुरू झालेल्या अगदी प्राथमिक टप्प्यातील व्यवसायांना, स्टार्ट-अप्सना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करतो. मागील दहा-बारा वर्षांचा माझा अनुभव आहे की काही स्टार्ट-अप्स ह्या खूप मोठा कर्मचारी वर्ग असलेल्या भारतातील प्रख्यात कंपन्या झाल्या आहेत. २२-२४ वर्षांच्या युवकांनी ही किमया करून दाखविली आहे; म्हणून माझी सूचना आहे की इ. ८ वी, ९ वीतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे व त्यातील ५-१०% विद्यार्थी जरी या क्षेत्राकडे वळले तरी ते चित्र समाधानकारक असेल.

शेवटी ते म्हणाले, 'मी पुन्हा एकदा सांगतो की येथे तुम्ही सादर केलेला कार्यक्रम आयुष्यभर माझ्या लक्षात राहील. येथील सर्व उपक्रम सिद्धीस नेण्यामागे नक्कीच दैवी शक्ती आहे. संस्थेच्या सर्वच उपक्रमांचे कार्य, व्यवस्था, परिसर पाहून भारावलेल्या श्री. लाडसरिया सरांनी भाषणाच्या शेवटी ट्रस्टला मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमानंतर सर्व मान्यवरांनी पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेला भेट दिली. शाळेच्या सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा, अत्याधुनिक संगणक कक्ष, समृद्ध ग्रंथालय, चाईल्ड फ्रेंडली चित्रमय पूर्व प्राथमिक वर्ग यांना भेट देऊन समाधान व्यक्त केले. तसेच शाळेच्या अटल टिंकरींग लॅबॉरेटरीमध्ये विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केलेल्या 'Smart Dustbin' व 'Automatic Soil



छोटे जवान!

Moisture Control' या वैज्ञानिक उपकरणांबद्दल माहिती दिली तसेच 3D Printer ची कार्यपद्धती जाणून घेतली. 'आर्ट अॅन्ड क्राफ्ट' दालनामध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकर्षक पेपर बॅग्ज, मेणबत्त्या, सिरॅमिक पॉट्स, गणेश मूर्ती, पेन्टिंग्ज, वॉल हॅन्गिंग्ज, पणत्या, इ. कलाकृतींच्या प्रदर्शनाला सर्व मान्यवरांनी भेट दिली.

या कार्यक्रमाला संस्थेचे प्रमुख विश्वस्त प.पू. काकामहाराज, कार्यकारी विश्वस्त मा. श्री. विकासराव वालावलकर, वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. सुनील नाडकर्णी, डॉ. पवनकुमार कोहली, डॉ. नंदन कानविंदे, डॉ. शर्मिला कानविंदे, शरयू यशवंतराव, शिक्षण संचालिका, डॉक्टर्स, संस्थेतील सर्व विभागातील शिक्षक, कर्मचारी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



निहाल विचारेचे चित्तथरारक मल्लखांब प्रात्यक्षिक



प्रजासत्ताक दिनाचा सोहळा पाहताना (डावीकडून) डॉ. नंदन कानविंदे, श्रीसद्गुरू काकामहाराज जोशी, डॉ. सुनील नाडकर्णी, श्री. आनंद लाडसरिया, श्री. विकासराव वालावलकर, श्रीमती आचलाताई जोशी, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. सौ. शर्मिला कानविंदे, डॉ. पवनकुमार कोहली

# डॉ. अरविंद नातू यांचा हृद्य सत्कार

जर्मन सरकारकडून 'क्रॉस ऑफ ऑर्डर ऑफ मेरिट' हा सर्वोच्च नागरी सन्मान मिळालेले ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. अरविंद नातू यांचा, श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे जयंती उत्सवाच्या निमित्ताने, श्रीकाकामहाराज जोशी यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, मानपत्र आणि रुपये एक लाख देऊन सन्मान करण्यात आला.



*श्रीकाकामहाराज जोशी यांच्या हस्ते डॉ. नातू यांचा सत्कार, सोबत श्री. विनायकराव पराडकर (डावीकडे)*

दि. २४ नोव्हेंबर २०१८ रोजी सायंकाळी श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात झालेल्या या समारंभात प्रथम श्री. विजय जोशी यांनी डॉ. नातू यांचा जीवनपरिचय श्रोत्यांना करून दिला. डॉ. नातूंची ज्येष्ठ कन्या डॉ. मंजिरी वैद्य यांनी उत्स्फूर्तपणे आपले विचार व्यक्त करताना मंदिरातील आपुलकीच्या, पवित्र आणि भारून टाकणाऱ्या वातावरणाचा उल्लेख करून, असा सत्कार अन्यत्र कोठेही झाला नाही असे आवर्जून सांगितले. त्यानंतर श्री. कमलेश जोशी यांनी इंग्रजी मानपत्राचे वाचन केले आणि त्यांच्या मराठी अनुवादाचे वाचन सूत्रसंचालक श्री. विवेक सरस्वते यांनी केले.

आपल्या उत्तराच्या भाषणात प्रथमच डॉ. नातूंनी, श्रीबाबामहाराज यांनी आपल्या डायरीत १९४४ सालचा नोबेल विजेता जर्मन शास्त्रज्ञ ऑटोहान याच्याविषयी केलेल्या नोंदीचा उल्लेख करून, येथे विज्ञानाविषयी आध्यात्मिक क्षेत्राने कुतूहल दाखवावे याविषयी आश्चर्य, अभिमान आणि कौतुक वाटते असे आवर्जून सांगितले. आपण आपले शिक्षण अतिशय कष्टाने पण स्वत:च्या हिंमतीवर पुण्यात येऊन केले. संपत्ती नव्हती पण लोकसंग्रह मोठा होता. तसेच समर्पित शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. जर्मनीला गेलो तेव्हाची परिस्थिती खूपच वेगळी आणि कठीण होती. पण सांस्कृतिक फरक असला तरी माणसातील 'माणुसकी' सर्वत्र सारखीच असते असे त्यांनी नमूद केले. संशोधनात नेहमीच यश मिळेल असे नाही. अपयश पचवता आले पाहिजे हे आपण जर्मनीत अल्पकाळ केलेल्या नोकरीत शिकलो. नॅशनल केमिकल लॅबोरेटरीत मला संशोधनासाठी सोयी, उद्योगजगताशी संपर्क, इंडस्ट्रिअल कन्सल्टंसी अशा सगळ्या गोष्टी उपलब्ध झाल्या. 'डी.एन.ए. डायग्नोसिस' या विषयावर संशोधन करू शकलो त्यामुळे रोगनिदान लवकर आणि कमी खर्चात होऊ लागले.

निवृत्तीच्या वयात 'ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ सायन्स ॲन्ड एज्युकेशन (आयसर)', पुणे येथे नव्याने कामाला सुरुवात केली असे सांगून आयसरचे वेगळेपण, उपयुक्तता आणि कार्य याविषयी ते विस्ताराने बोलले. आता आपण विद्यार्थ्यांचे प्रबोधन हे कार्य 'मिशन' म्हणून स्वीकारले असून त्यासाठी अगदी खेडोपाडीसुद्धा जात असतो. विज्ञान आणि अध्यात्म या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून डेरवणला श्रीकाकांनी त्याची योग्य सांगड घातली आहे. तेथे जागतिक पातळीवर दखल घेतली जाईल असे मोठे संशोधन केंद्र व्हावे. त्यासाठी आपण सर्व सहकार्य करू असे सांगून सत्काराबद्दल त्यांनी आभार मानले.



*डॉ. नातू सत्काराला उत्तर देताना*

# डॉ. रसिका ढेकणे यांची डेरवणला भेट

बोस्टन (अमेरिका) येथील डॉ. रसिका ढेकणे, एम.डी. आणि सॉफ्टवेअर क्षेत्रातील तज्ज्ञ उद्योजक श्री. रघुनंदन आणि सौ. मीना जोशी यांनी नुकतीच डेरवणला भेट देऊन रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, शाळा, क्रीडासंकुल यांची पाहाणी करून समाधान व्यक्त केले.


डॉ. ढेकणे आणि श्री. रघुनंदन जोशी यांनी नोंदविलेल्या अभिप्रायाचा स्वैर अनुवाद –

''बी.के.एल. वालावलकर हॉस्पिटल, मेडिकल कॉलेजचा अद्यापक वर्ग, रुग्णालय आणि शाळेतील कर्मचारी वर्ग, माझी भाची मीना जोशी आणि तिचे पती रघुनंदन यांनी व्यवस्था केल्यामुळे आपल्या या भव्य–दिव्य संस्थेची पाहाणी करण्याची संधी मला मिळाली याचा मला फार आनंद होत आहे. अतिशय उत्तम जडणघडण असलेल्या या संस्थेचे उत्कृष्ट व्यवस्थापन पाहून, या लहानशा दुर्गम गावात अशा उत्तम दर्जाची सुविधा देण्यात येते याचा मला अत्यंत अभिमान वाटतो.

पुन्हा एकदा येथे भेट देऊन, येथे राहून येथील कामाचे कौतुक करायला मला आवडेल. श्री. मुणगेकर अणि श्री. उगले यांनी आमच्यासोबत फिरून दिलेल्या माहितीबद्दल आभार. सौ. यशवंराव यांच्या सौजन्याने आम्हाला शाळाही पाहता आली.

संस्थेच्या निरंतर यशासाठी आमच्या खूपखूप शुभेच्छा.''

– रसिका ढेकणे, एम.डी.; बोस्टन, यू.एस.ए.



146 219 • WEEK 22

Dear BKL Walawalkar Hospital
Medical faculty and hospital, School Staff Members,

I am very happy that my niece and her husband Raghunandan and Meena Joshi gave me the opportunity and arranged to give a guided tour of your vast and amazing facility. It is organized so well, managed so beautifully that it made me proud to have a facility of this caliber in India's small and remote town.
I would definitely like to visit again and stay here to really appreciate this project.
Thanks to Mr. Mungekar and Mr. Ugale for such an informative guided tour,
Mrs. Yeshwantrao was gracious in giving us guided tour of the school.
All the Best for continuing success,

– Rasika Dhekne, MD.
Boston, USA.
22 December, 2018.

The B.K.L.W. Hospital and School Complex has made tremendous progress since our last visit few years back. The dedicati professional attitude & hard work put in by all who work here and manage is exemplery. All this has been achieve under the divine and beneficient guidance of Kaka Maharaj (Respected Shri Ashok Joshi) We are awe-struck by the achievements of this magnificent Institution. We wish all the best & pray for almighty's Blessings to all.
Raghunandan & Meena J
22-12-2018

*डॉ. ढेकणे आणि श्री. रघुनंदन जोशी यांनी नोंदविलेला अभिप्राय*

''आम्ही यापूर्वी काही वर्षांमागे येथे आलो होतो त्यानंतर भ.क.ल. वालावलकर रुग्णालय आणि क्रीडासंकुलाने प्रचंड प्रगती केली आहे. येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आणि व्यवस्थापकांची समर्पित वृत्ती, व्यावसायिक दृष्टिकोन आणि मेहनत अनुकरणीय आहे. हे सर्व श्रीकाकामहाराजांच्या (माननीय श्री. अशोक जोशी) कृपाळू आणि दैवी मार्गदर्शनाखाली साध्य होत आहे. या महान संस्थेच्या कामगिरीने आम्ही भारावून गेलो आहोत. सर्वांना आमच्या शुभेच्छा व्यक्त करतो आणि सर्वांसाठी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.''

– रघुनंदन आणि मीना जोशी



*अटल टिंकरिंग लॅबची पाहाणी करताना, डावीकडून सौ. यशवंतराव, डॉ. ढेकणे, सौ. मीना आणि श्री. रघुनंदन जोशी*

# वालावलकर रुग्णालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात




*प्रमुख पाहुण्या गिरीजा ओक यांचे स्वागत करताना,*
*डावीकडून - डॉ. सुवर्णा पाटील, सौ. शरयू यशवंतराव आणि*
*श्रीमती कोपल, प्राचार्य समर्थ नर्सिंग स्कूल*

प्रतिवर्षाप्रमाणे सन २०१९ चे भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या नर्सिंग कॉलेज, कॉलेज ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज व समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युटचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. २१ जानेवारी २०१८ या दिवशी जल्लोषात साजरे झाले.

मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्री गिरीजा ओक या प्रमुख पाहुण्या होत्या. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यानंतर रुग्णालयात असलेल्या निरनिराळे विभाग, त्या विभागात कार्यरत असलेले कर्मचारी, नर्सिंग कॉलेजच्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थीनी यांचा पारितोषिक वितरण समारंभ झाला व रुग्णालयाच्या माध्यमातून सुरू असलेल्या बचत गटांसाठी काम करणाऱ्या स्त्रियांना गिरीजा ओक यांचे हस्ते सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

स्नेहसंमेलनात असलेला जोष व विविध गुणदर्शनात आपली कला सादर करणाऱ्या कलाकारांचा उत्साह पाहून आलेल्या पाहुण्या अतिशय आनंदित झाल्या. ''हे स्थान मला माहिती होते. मात्र प्रत्यक्ष येण्याचा योग आज आला. इथे उभे राहिलेले काम पाहिले. रुग्णालय, नर्सिंग कॉलेज, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व मेडिकल कॉलेज हे सर्व पाहिले. अतिशय आनंद झाला. भविष्यात विद्यार्थिनींना कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास मला मदत करायला आनंद वाटेल'' असे विचार आपल्या मनोगतात व्यक्त करून गिरीजा ओक यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या .



*विविध गुणदर्शनात आपली कला सादर करताना विद्यार्थिनी*

# ईशा पवारला दुसऱ्या वर्षीही 'खोलो इंडिया'मध्ये सुवर्णपदक




*सुवर्णपदक विजेती ईशा पवार*

गतवर्षीच्या 'खेलो इंडिया'त तिरंदाजीच्या कम्पाउंड प्रकारात सुवर्णपदक मिळवणाऱ्या ईशा पवारने याही वर्षी सुवर्णपदक मिळवून बाजी मारली आहे. पुण्यातील आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्युटच्या मैदानावर १७ वर्षाखालील मुलींच्या गटात तिने अंतिम फेरीत अटीतटीच्या लढतीत दिल्लीच्या संचिता तिवारीला १४५-१४२ अशा गुणांनी पराभूत केले. डेरवण क्रीडासंकुलात प्रशिक्षक ओंकार घाडगे आणि पुणे येथील प्रशिक्षक श्री. रणजित चामले यांच्या मार्गदर्शनाखाली कसून सराव करून तिने हे यश मिळविले आहे. ईशा पवारचे हार्दिक अभिनंदन !

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# क्रीडासंकुलात पहिल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन

एस. व्ही. जे. सि. टी. क्रीडासंकुलात पहिल्या बी.के.एल. वालावलकर जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १० फेब्रुवारी २०१९ रोजी असून १०, १२, १४ आणि १७ वर्ष वयोगटातील मुले व मुली या वयोगटांसाठी घेण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये ५० मीटर फ्री स्ट्रोक, ५० मीटर बॅक स्ट्रोक, ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक, ५० मीटर बटरफ्लाय आणि इंडिव्हिज्युअल मिडले या प्रकारांचा समावेश करण्यात आलेला आहे. विजेत्या खेळाडूंना पदके तसेच चषक देवून गौरविण्यात येणार आहे.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून फेब्रुवारी २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रकः

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस. ऑर्थो) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०२ फेब्रुवारी | डॉ. भारती खांडेकर, मुंबई (प्लॅस्टिक सर्जन) | दुभंगलेले टाळ व ओठ शस्त्रक्रिया तज्ज्ञ |
| १० फेब्रुवारी | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट) | पोटाच्या विकाराचे तज्ज्ञ |
| १६ फेब्रुवारी | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| १६ फेब्रुवारी | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| १६ फेब्रुवारी | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक)<br>सकाळी १०.०० ते १.०० वालावलकर रुग्णालय, डेरवण येथे.<br>सायंकाळी ५.०० ते ८.०० UHTC चिपळूण येथे | त्वचारोग तज्ज्ञ |
| १७ फेब्रुवारी | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| १७ फेब्रुवारी | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |
| १७ फेब्रुवारी | डॉ. के. मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाच्या विशेषज्ज्ञ व उपचार |
| | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियांचे तज्ज्ञ |

**दि. २६ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०१९ अखेर इंग्लंड येथील डॉक्टरांचे शस्त्रक्रिया शिबिर**

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या शनिवारी वाचा-उच्चार तज्ज्ञ डॉ. विशाखा या वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.

**डोहाळेजेवण व सासू-सून मेळावा –** २० फेब्रुवारी – RHTC व वालावलकर येथे

वालावलकर रुग्णालय येथे RHTC व वालावलकर रुग्णालय यांच्यातर्फे मुलांचे **'अर्धवार्षिक वाढदिवस'** – २२ फेब्रुवारी, **सरपंच मेळावा –** २२ फेब्रुवारी

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर